<u>नियमित दिवाणी दावा क्र.१८५/२०२० मधील अर्ज नि.क्र.३८ वरील आदेश</u>

**CNRMHSN06002063-2020**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांची कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याबाबत विनंती केली आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या अर्जामधील कथन असे की, सदर प्रतिवादी यांना प्रस्तुत दाव्याची नोटिसची बजावणी दिनांक ०८/०२/२०२२ रोजी झालेली आहे. प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास सुमारे ७ महिन्यांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा प्रतिवादींचे आजरपणामुळे झालेला आहे. सदरचा विलंब हा त्यांनी जाणुनबुजून केलेला नाही. सबब त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश पारीत करावे अशी विनंती केली आहे.

४. अर्जामधील कथने प्रतिवादी यांनी शपथेवर सांगितलेली आहेत. प्रतिवादीस दाव्यास कैफियत दाखल करण्यास ९० दिवसांपेक्षा जास्त विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा प्रतिवादी हे आजारी असल्याने झाल्याचे कथन केले आहे. अर्जामधील कथने ही मोघम स्वरुपाची वाटतात. तरी देखील प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची कैफियत अभिलेखावर आलेस वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून प्रतिवादी यांना एक संधी देणे आवश्यक वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना त्यांची कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येवुन कैफियत अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

**सही/-**

मिरज.

**(स्वाती भा. नाईकनवरे-गरड)**

दि. ०८/११/२०२२

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज